९१

शासकीय, निमशासकीय सेवेतील सरळ सेवा भरती व पदोन्नतीमधील, अनुशेषाची रिक्त पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिम सुरु करण्याबाबत.

---

**महाराष्ट्र शासन,**

सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्रमांक-बीसीसी-1095/966/सीआर-5/95/16-ब,

मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक 5 एप्रिल 1999.

वाचा :- 1) शा.प.सा.प्र.वि.क्र.बीसीसी-1095/966/प्र.क्र.5/95/16-ब, दि.29.8.98

2) शा.प.सा.प्र.वि.क्र.बीसीसी-1095/966/प्र.क्र.5/95/16-ब, दि.11.9.98

3) शा.प.सा.प्र.वि.क्र.बीसीसी-1095/966/प्र.क्र.5/95/16-ब, दि.18.12.98

**परिपत्रक** :- उपरोक्त क्र.1 व 2 येथील शासन परिपत्रकान्वये, शासकीय, निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरती व पदोन्नती यामधील अनुशेषाची रिक्त पदे विशेष भरती मोहिमेद्वारे भरण्याचे आदेश देण्यात आले आहे. या विशेष भरती मोहिमेमध्ये, दि.28.2.99 अखेर भरण्यात आलेल्या अनुशेषाची माहिती मागविण्यात आली आहे. या विशेष भरती मोहिमेस कोणतीही मुदत ठरविण्यात आलेली नाही. याबाबत, उपरोक्त परिपत्रके सुस्पष्ट आहेत. तरी याबाबतीत संभ्रम राहू नये म्हणून या परिपत्रकाद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, अनुशेष भरण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष भरती मोहिमेस कोणतीही मुदत घालण्यात आलेली नसल्याने ही मोहिम, पुढील आदेश होईपर्यंत सुरुच राहील.

2. यासंदर्भात असेही ओदश देण्यात येत आहेत की, दि.11.9.98 च्या परिपत्रकाप्रमाणे, मंत्रालयीन विभागांनी, तसेच विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दि.28.2.99 अखेर भरण्यात आलेल्या अनुशेषासंबंधीची एकत्रित माहिती अंतिम आकडेवारीसह, या विभागाकडे त्वरित पाठवावी. तसेच विभागाच्या नियंत्रणाखालील मंडळे, महामंडळे व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यासंबंधीची माहिती स्वतंत्ररित्या पाठवावी. मंत्रालयीन विभागांनी माहिती पाठविताना ती परिपूर्ण व बिनचूक असल्याची खात्री करुन घ्यावी व तसे प्रमाणित करावे.

तसेच त्यानंतर दर सहा महिन्यांनी (म्हणजेच दरवर्षी ऑगस्ट व फेब्रुवारी अखेर) भरण्यात आलेल्या अनुशेषाची माहिती त्या नंतरच्या महिना अखेर पाठविण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शि. शा. हिरीजगनेर,
उप सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,